एलआयसीला दोन कोटींचा गंडा

नाशकातील पीएनबी बँकेच्या हॉल इन्चार्जकडून धाडसी फसवणूक

नाशिक | प्रतिनिधी

पंतप्रधान जीवन ज्योती विम्यासह अन्य केंद्रीय योजनांचे तब्बल दोन कोटी रुपये पंजाब नॅशनल बँकेच्या एका हॉल इन्चार्ज अधिकाऱ्याने बनावट विमाधारक उभे करुन लाटल्याचा खळबळजनक प्रकार शहरात घडला आहे. या अधिकाऱ्याने पदाचा व बँकेच्या लॉग इन आयडीचा गैरवापर करुन पत्नी व कुटुंबासह नातलगांच्या बँक खात्यात या योजनांचे पैसे एनईएफटी करुन घेत एलआयसीला व पीएनबीला हा गंडा घातला. यात तब्बल १०६ बनावट वारसदार तयार करत दाव्यांपोटी एलआयसीने वितरीत केलेले पैसे या अधिकाऱ्याने नातलगांच्या बँक खात्यांत वळते करुन या पैशांची बेकायदेशिर वैयक्तिक 'मुदतठेव' योजना राबविल्याचेही समोर आले आहे.

दीपक मोतीलाल कोळी(वय ४०, रा. भारद्वाज रेसिडेन्सी, भुजबळ फार्मजवळ, नवीन सिडको, नाशिक) असे संशयित हॉल इन्चार्ज अधिकाऱ्याचे नाव आहे. या फसवणूक प्रकरणी कॅनडा कॉर्नर येथील पंजाब नॅशनल बँकेच्या शाखा प्रबंधक लतीका मधुकर कुंभारे यांनी सरकारवाडा पोलिसांत फिर्याद नोंदविली आहे. हा संपूर्ण प्रकार जुलै २०२२ ते २८ नोव्हेंबर २०२४ पर्यंत कॅनडा कॉर्नर येथील शाखेत घडला आहे. कुंभारे यांच्या फिर्यादीनुसार, कोळी हा बँकेत जुलै २०२२ पासून कार्यरत असून, काही महिन्यांपूर्वी केंद्र सरकारने सर्वसामान्यांसाठी प्रधानमंत्री जीवनज्योती विमा व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना सुरु केली आहे. या योजनेसाठी एलआयसी व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेसाठी ओरिएंटल इन्शुरन्स कंपनीची मास्टर पॉलिसी होल्डर म्हणून नेमणूक असताना विमाधारक खातेदार मृत पावल्यावर वारसदाराने विमा रकमेचा दावा करण्यासाठी बँकेचा फॉर्म व त्यासोबत सादर केलेले मृत्यू प्रमाणपत्र, ओळख पटविणारे कागदपत्रे, विमा हप्ता भरल्याचे पुरावे व वारसदाराचे बँक खात्याचा तपशिल व ओळखपत्र अशी कागदपत्रे सादर केल्यावर ती बँकेकडून पडताळणी करुन संबंधित एलआयसी किंवा ओरिएंटलच्या पोर्टलवर अपलोड केले जातात. त्याचवेळी बँक खातेदारांना सुविधा पुरविण्याचे कामावर देखरेख व समन्वय साधण्याचे काम दीपक कोळी पाहत होता. पंधरा लाख रुपयापर्यंतच्या कोणत्याही व्यवहारामध्ये निर्णय घेण्याचे अधिकार दीपकला होते. त्यामुळे दोन्ही विमा योजनांमध्ये प्रत्येक प्रकरणामधील दोन लाख रूपये रक्कम योजनेमधील सर्व लाभार्थ्यांना पुरविण्याचे काम कोळी हेच पाहत होता. त्याला दिलेला लॉग इन व पासवर्ड कुणालाही माहीत नसताना, त्याने हा गंडा घातला.

कोळी अडकला स्वत:च्या जाळ्यात

२७ नोव्हेंबर रोजी बँकेतील लिपीक प्रतिभा कुमारी यांच्याकडे दीपकने १९ खातेधारकांची यादी दिली. त्यात त्यांचे केवायसी कागदपत्रांमधील आधारकार्ड नंबर काढून टाकत त्याऐवजी मतदार ओळखपत्र क्रमांक नोंद करण्यास सांगितले. प्रतिभा यांना या बाबीचा संशय आल्याने त्यांनी व्यवस्थापक कुंभारे यांना सांगितले. एकूणच प्रकरणे संशयास्पद वाटल्याने कुंभारे यांनी या १९ खात्यांची माहिती घेतली असता त्यातील आठ खात्यावर जीवन ज्योती योजनेतून विमा धारकांच्या वारसदारांच्या खात्यावर येणारे प्रत्येकी दोन लाख रुपये जमा झाले होते आणि हेच पैसे दीपक कोळीने स्वत:सह पत्नी, आई, वडील, भाऊ व इतरांच्या बँक खात्यावर एनईएफटी, आरटीजीएसद्वारे वळविल्याचे दिसून आले.

खातेनिहाय चौकशी सुरुच

मुख्य प्रबंधक अजित साहू यांच्या आदेशाने कुंभारे यांनी विभागीय चौकशी करुन अहवाल सादर केला. त्यात आतापर्यंत १०६ बनावट वारसदारांच्या बँक खात्यावर एकूण २ कोटी १२ लाख रुपये वळते केले आहेत. तर, आता बनावट वारसदार तसेच अपहार झालेल्या रकमेत वाढ होण्याची शक्यता आहे. शिवाय ज्या विमाधारक खातेधारकांचा मृत्यू दाखवून ही रक्कम ज्या संशयित वारसदारांच्या खात्यावर गेली व असे विमाधारक खातेदार मृत झाले आहेत की कसे मृत पावले आहेत, याची चौकशी सुरु आहे.

मुद्दे

–१०६ बोगस खातेदारांच्या फॉर्मवर नमूद मोबाईल नंबर कालबाह्य
– अनेक मोबाईल क्रमांक अस्तिवाततच नाही, चुकीचे नंबर नोंद
–केवायसी पडताळणीत खातेदारांचे आधारकार्ड नंबर एकसारखेच
– वारसदारांचे बँक खाते बनावट कागदपत्रांच्या आधारे उघडले.
–तोतया वारसदारांमध्ये कोळीचेच नातेवाईक, कुटुंब,
–प्रत्येकी दोन लाख रुपयांप्रमाणे कुठे वर्ग झाले याचा तपशिल उघड.
–कोळीने व अनोळखी साथीदारांनी १०६ बनावट मृत्यूपत्रे बनवली

गार्गी सोनवणेला धनुर्विद्या स्पर्धेत कांस्यपदक

नाशिक | गुजरातमधील नडियाड खेडा येथे नुकत्याच पार पडलेल्या चौदा वर्षांखालील मुला-मुलींच्या ६८ व्या राष्ट्रीय शालेय धनुर्विद्या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघातील मविप्र संचलित उदाजी होरायझनची विद्यार्थिनी गार्गी धनंजय सोनवणे हिला कांस्यपदक मिळाले.

या राष्ट्रीय स्पर्धेत १४ वर्षांखालील मुलींच्या धनुर्विद्या स्पर्धेसाठी २६ राज्यांतील एकूण १०४ खेळाडू सहभागी झाले होते. सदर स्पर्धेमध्ये इंडियन राउंड खेळ प्रकारात महाराष्ट्राच्या १४ वर्षांखालील मुलींच्या संघाने तिसरे स्थान पटकावत कांस्यपदक मिळवले. या संघाला स्पर्धेतील विजेतेपद देऊन गौरविण्यात आले. उदाजी होरायझनच्या गार्गीला धनुर्विद्या प्रशिक्षक प्रतीक थेटे व क्रीडाशिक्षक अमोल शेटे, प्रिया भावसार यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या यशाबद्दल मविप्रचे सरचिटणीस तथा नाशिक जिल्हा धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष ॲड. नितीन ठाकरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मविप्रचे अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, सर्व संचालक मंडळ, शिक्षणाधिकारी प्रा. डॉ. कैलास शिंदे व मुख्याध्यापिका नेहा सोनवणे यांनी गार्गीचे अभिनंदन केले.

महात्मा फुले यांच्या विचारांनी प्रभावित होऊनच मविप्रची स्थापना : ॲड.ठाकरे

सिन्नर महाविद्यालयात महात्मा फुले स्मृतिदिन कार्यक्रम

नाशिक | प्रतिनिधी

बहुजन आणि दलितांसाठी अत्यंत प्रतिकूल असलेल्या काळात महात्मा फुले यांनी दलित बहुजन आणि स्त्रियांच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या. त्यामुळे हजारो वर्षे अज्ञानात खितपत पडलेल्या समाजाला प्रगतीची दारे खुली झाली. त्यामुळेच या सर्व समाजातील स्त्रिया आणि मुले आज वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये भरारी घेत आहेत. आपली मविप्र समाज संस्थासुद्धा महात्मा फुले यांच्या विचारांनी प्रभावित होऊनच स्थापन झाली आहे, असे प्रतिपादन मविप्र समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे यांनी केले.

सिन्नर येथील गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महात्मा फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी ते म्हणाले की, महात्मा ज्योतिराव फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी अगोदर स्वतःच्या पत्नीला शिकवले आणि भारतीय समाजासमोर स्त्री शिक्षणाचा मोठा आदर्श उभा केला. त्यामुळे आज आपल्या देशात स्त्री शिक्षणाला सर्वच क्षेत्रात प्राधान्य दिले जाते. याप्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ, उपप्राचार्य प्रा. आर. व्ही. पवार, विज्ञान विभाग प्रमुख प्रा. एस. टी. पेखळे व इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. पी. व्ही. रसाळ यांनी सांगितले की, महात्मा फुले यांनी प्रसंगी अनेकदा विशिष्ट समाजाचा रोषही पत्करला मात्र शिक्षणाच्या कार्यामध्ये खंड पडू दिला नाही. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर सेवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सहाय्यक उपनिरीक्षकाची महिलेस धमकी

दोन स्वतंत्र गुन्हे दाखल

नाशिक | प्रतिनिधी

काठेगल्लीतल्या एका सोसायटीत कार चार्जिंगला लावण्यावरुन झालेल्या जबरदस्त राड्यात शहर पोलीस दलातील एएसआयने कार चालकासह महिलेला ठार मारण्याची धमकी दिली. त्यावरुन सहाय्यक उपनिरीक्षक शंकर जर्नादन गोसावी (वय ५४, रा. काठेगल्ली) या संशयिताविरुद्ध महिलेले फिर्याद दिली आहे. त्यावरुन गोसावीविरुद्ध गंभीर दुखापतीसह विनयभंग असे दोन स्वतंत्र गुन्हे भद्रकाली पोलिसांनी दाखल केले आहेत. या गुन्ह्यांबाबत भद्रकाली पोलीस पुढील तपास करीत आहेत. विशेष म्हणजे सन २०२३ मध्ये या अंमलदारास महाराष्ट्र दिनानिमित्त पोलीस महासंचालक पदकाने सन्मानित करण्यात आले होते.

काठेगल्लीतील श्री आयकॉन इमारतीत राहणाऱ्या एका कुटुंबाकडे वाहन चालक म्हणून काम करणाऱ्या रमेश दत्तात्रय फड (वय ४७, रा. राणेनगर) याने फिर्याद दिली आहे.

त्यानुसार शहर पोलीस हेडक्वॉर्टरला नेमणुकीस असलेल्या शंकर गोसावीविरुद्ध गंभीर दुखापतीचा गुन्हा नोंद आहे. यासह त्याने गोसावीने कार मालक महिलेला शिवीगाळ करुन अश्लील हातवारे केले. तसेच महिलेलादेखील 'सर्व्हिस रिव्हॉल्व्हर'ने जीवे ठार मारण्याची धमकी दिली. त्याबाबत पीडित महिलेले दिलेल्या फिर्यादीवरुन गोसावीविरुद्ध विनयभंगाचाही गुन्हा नोंद झाला आहे. दरम्यान, २८ नोव्हेंबर रोजी दुपारी दोन वाजेच्या सुमारास फड हा सोसायटीत कार उभी करुन चार्जिंगला लावत होता. त्यावेळी संशयिताने त्याला मज्जाव करुन त्याच्यासह मालकाला शिवीगाळ केला. फडच्या हाताला गंभीर दुखापत केली. तसेच 'माझ्याकडे रिव्हॉल्व्हर आहे. नादी लागू नका, तुमचा गेम करुन टाकेन', अशी धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, दीड महिन्यापूर्वी व पंधरा दिवसांपूर्वी गोसावीने याच कारणातून वाद घातला होता. तर 'डायल ११२'वर संपर्क साधत पोलिसांनाही बोलावल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

गोसावी मार्चमध्ये लाचखोरीत सापडले होते

५ मार्च रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने शंकर गोसावी याला कॅफे चालकांकडून अडीच हजार रुपयांचा 'हफ्ता' घेतांना अटक केली होती. गोसावी हा पोलीस आयुक्तालयातील विशेष शाखेत कार्यरत असताना एका कॅफेसंदर्भात अर्ज प्राप्त होता. त्याने कारवाई करण्याऐवजी कॅफे चालकाकडून 'हफ्ता' वसुली केली. त्यामुळे आयुक्तालयाने त्याला निलंबित केले होते. त्याने यापूर्वी बेपत्ता मुलींना शोधण्याचे उत्तम कार्य बजावले होते. मात्र, भाडेतत्त्वावर घर देणे, दगड-विटा, वाळूची विक्रीही केली. त्यामुळे पोलीस सेवेव्यतिरिक्तही त्याने इतरही व्यवसाय केल्याचे 'एसीबी' चौकशीत उघड झाले होते.

बेलतगव्हाण येथे दरोडा

चुंभळे पुत्राची तडीपार पदाधिकाऱ्याविरोधात फिर्याद; पाच जणांवर गुन्हा

नाशिक | प्रतिनिधी

कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती शिवाजी चुंभळे यांच्या पुत्राच्या बेलतगव्हाण येथील कार्यालयावर जमावाने तोडफोड करीत लॉकरमधील पावणे दोन लाखांची रोकड दरोडा टाकून पळवली. याप्रकरणी शिवसेनेच्या उद्धव ठाकरे गटात नुकताच पक्ष प्रवेश केलेला सराईत पवन पवार याच्यासह पाच संशयितांविरोधात दरोड्याचा गुन्हा देवळाली कॅम्प पोलिसात दाखल करण्यात आला आहे. ही घटना आठवडाभरापूर्वी घडली असून तिला अनेक आर्थिक व्यवहार व राजकीय कंगोरे असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

पवन पवार, विशाल पवार, रामेश्वर पटेल, युवराज मोरे, नाना पगारे अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या संशयितांची नावे आहेत. प्रताप शिवाजी चुंभळे (३४, रा. पांडुरंग निवास, लेखानगर, सिडको) यांच्या फिर्यादीनुसार, त्यांची भागीदारीमध्ये महावीर एन्टरप्राईजेस् कंपनी असून, बेलतगव्हाण येथील कंपनीच्या आवारातील कार्यालयाचे काम सुरू होते.

कार्यालयात सीसीटीव्ही बसविण्याचे काम सुरू होते. २२ तारखेला रात्री सव्वा सात वाजेच्या सुमारास संशयित पवन पगार याच्यासह ५० जणांनी लाठ्या-काठ्या घेऊन जाऊन बंगाल्यासमोर येत सुरक्षारक्षकांना दमदाटी केली. सुरक्षारक्षक अलोक साळवे, दर्शन साळवे यांना शिवीगाळ व मारहाण करीत आत प्रवेश केला. त्यानंतर संशयितांनी सीसीटीव्हीचे काम करणाऱ्या हार्दिक शहा यासही मारून टाकण्याची धमकी देत हाकलून दिले.

यानंतर संशयितांनी कार्यालयातील वस्तूंची तोडफोड करीत, कार्यालयातील टेबलच्या ड्रॉवरमधील १ लाख ७० हजारांची रोकड चोरून नेली. अशा रितीने संशयितांनी तोडफोड व चोरी करीत २ लाख ४७ हजार ७०० रुपयांचे नुकसान केले. देवळाली कॅम्प पोलिसात दरोड्याचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, उपनिरीक्षक देवरे तपास करीत आहेत.

चोरट्यांनी फोडली दानपेटी

आडगाव शिवारातील शरयू पार्कमधील मंदिरात चोरी

पंचवटी | प्रतिनिधी

थंडीच्या दिवसांत रात्रीच्या वेळी नागरिक घराबाहेर पडत नसल्याने चोरट्यांनी त्याचा फायदा घेत मंदिरातील दानपेटीवर लक्ष केंद्रीत केले आहे. आडगाव शिवारातील शरयू पार्क येथील गणेश कॉलनीतील गणपती, महालक्ष्मी व पवनपुत्र हनुमान मंदिरातील शनिवार (दि. ३०) रोजी मध्यरात्रीच्या सुमारास दानपेटी चोरट्यांनी फोडल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी आडगाव पोलीस अधिक तपास करीत आहेत.

मुंबई- आग्रा महामार्गावर आडगाव शिवारातील शरयू पार्क येथील गणेश कॉलनीतील गणपती, महालक्ष्मी व पवनपुत्र हनुमान मंदिर आहे. शनिवार (दि. ३०) रोजी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी या मंदिरांना लक्ष करीत येथील दानपेट्या फोडल्याची घटना घडली आहे. अज्ञात चोरट्यानी या दानपेट्यातील रोख रक्कम चोरून नेली आहे. सदर बाब ही सकाळी मंदिरात पूजा करण्यासाठी गेले असता लक्षात आली. स्थानिक नागरिकांनी आडगाव पोलीस ठाण्यास संपर्क करून घटनेची माहिती दिली. त्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले. या भागात पोलिसांची गस्त वाढवावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

नाशिक- शहरात मोठ्या प्रमाणात थंडी असल्यामुळे थंडीचा फायदा घेऊन मध्यरात्रीनंतर चोरीचे प्रमाण वाढत आहेत. पोलिसांनी गस्त पथक वाढवावे, चोरांचा मुसक्या आवळल्या पाहिजेत.

-सुनील जाधव,
महानगर संघटक, शिवसेना(उबाठा)

वाहनाची चोरी

नाशिक | मखमलाबाद नाका येथून दुचाकी चोरुन नेण्यात आली. नीलेश भास्कर सोमवंशी (रा. राजपाल कॉलनी, मखमलाबाद नाका) याची ८० हजारांची दुचाकी (एमएच १५ जेआर ४९५६) बुधवारी (ता. २७) मध्यरात्री अज्ञात चोरट्याने चोरून नेली. याप्रकरणी पंचवटी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे.

गोल्डन होरायझन स्कूलच्या क्रिकेट संघाचे यश

नाशिक | गोल्डन होरायझन स्कूल (जीएचएस) च्या क्रिकेट संघाने विझडम हायस्कूलविरुद्धच्या रोमांचक सामन्यात दणदणीत विजय मिळवला. जीएचएसच्या संघप्रभारी शिक्षिका जयश्री यांच्या मार्गदर्शनाखाली मुलांनी अप्रतिम कौशल्य व टीमवर्कचे दर्शन घडवत १२२ धावांनी उल्लेखनीय विजय मिळवला. जीएचएस संघाने प्रथम फलंदाजी करताना २७ षटकांत १५६ धावांचे आव्हान ठेवले. अयान झुल्फिकार शेखने १५ धावांचे योगदान देत ७ षटके, ४ मेडन, १२ धावा देऊन ७ विकेट्स घेत शानदार गोलंदाजी केली. त्याच्या अष्टपैलू कामगिरीमुळे त्याला सामनावीराचा किताब मिळाला. जीएचएसचे चेअरमन संदीप गोयल आणि मुख्याध्यापिका शैला थॉमस यांनी संघाच्या प्रयत्नांचे कौतुक करताना सांगितले की, हा विजय आमच्या विद्यार्थ्यांची मेहनत, बांधिलकी आणि आमचे समर्पित कर्मचारी यांच्या मार्गदर्शनाचे प्रतिबिंब आहे. अशा खेळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होण्यास आणि टीमवर्क वाढण्यास मदत होत असल्याचे त्यांनी सांगितले. नाशिक जिल्हा अध्यक्ष अशोक सावंत यांनी नाशिकने ही जबाबदारी स्विकारली असून या स्पर्धाचे आयोजन उत्कृष्टपणे पार पडावे, यासाठी महाराष्ट्राचे आणि नाशिक जिल्ह्याचे सर्व संघटक आणि कार्यकर्ते गेल्या दीड महिन्यापासून कार्यरत असल्याचे सांगितले. याप्रसंगी खेळाडूंना देण्यात येणारे प्रमाणपत्र आणि मेडल्स यांचेही अनावरण करण्यात आले. या स्पर्धेत सहभागी सर्व खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र तर या स्पर्धेमध्ये विविध खेळांमध्ये पहिले तीन क्रमांक पटकावणाऱ्या खेळाडूंना सुवर्ण, रौप्य आणि कांस्य पदके आणि प्राविण्य प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात येणार आहे. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नाशिक जिल्हा खेळों मास्टर्स असोसिएशन आणि विविध खेळांचे सर्व संघटक आणि कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत. या उपक्रमाला आपल्या माध्यमातून जास्तीत जास्त प्रसिद्धी मिळावी जेणेकरून मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांमध्ये उत्साह द्विगुणित होईल आणि आणखी खेळाडू सहभागी होतील अशी अपेक्षा अशोक सावंत आणि अनाम चौधरी यांनी व्यक्त केली.

युवतीला मारहाण

नाशिक | जयभवानी रोडवरील लवटेनगर येथे चौघांनी युवतीला कुरापत काढून मारहाण केली. संदीप शर्मा, मनिश ठाकूर, बेबी देवी, खुशबू देवी अशी संशयितांची नावे आहेत. मोनीकुमारी सुभाष ठाकूर (२३, रा. शहाणे अपार्टमेंट, लवटे नगर, जय भवानीनगर) यांच्या फिर्यादीनुसार, २३ तारखेला रात्री साडेसातच्या सुमारास संशयितांनी तुझ्या आई-वडिलांनी काय अडचण आहे अशी कुरापत काढून शिवीगाळ केली. तर संशयित खुशबू हिने लाकडी दांडक्याने मारून दुखापत केली. उपनगर पोलिसात गुन्हा दाखल आहे.

निधन वार्ता...

रघुनाथ अरिंगळे

नाशिकरोड | देवळाली गाव रोकडोबावाडी येथील श्री गुरु नित्यानंद, स्वामी जनानंद आश्रम ट्रस्टचे माजी अध्यक्ष रघुनाथ (शेठ) कोंडाजी अरिंगळे (८१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे. सामाजिक कार्यकर्ते जयेश अरिंगळे यांचे ते वडील होत.

राहुल गिते

नाशिक | राजीव नगर विशाखा कॉलनी येथील रहिवासी राहुल अशोक गिते (४१) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, आई, वडील, २ भाऊ, मुलगा, मुलगी असा परिवार आहे. ते नाशिक जिल्हा क्रिकेट असोसिएशनतर्फे नाशिक जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणारी खेळाडू श्रुती राहुल गिते हीचे वडील होत.

आनंदा सोनवणे

पंचवटी | दिंडोरी रोडवरील स्वामी सोसायटी, लामखडे मळा यथील रहिवासी आनंदा दादा सोनवणे तथा अण्णा (८४) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी, सुना, जावई, पुतण्या, पुतणी, नातवंडे असा परिवार आहे. योगेश व प्रशांत सोनवणे यांचे ते वडील होत.

क्लासिफाईड /सुपरमार्केट

पाहिजेत

टाटा ११०९ वर नाशिक (अंबड ते सातपूर महिंद्रा) निर्व्यसनी लोकलसाठी २ ड्रायव्हर पाहिजे. हेवी लायन्सस आवश्यक. 9822912852 / 9970397777.
(04/12-BK-7595)

भाड्याने देणे/घेणे

2 BHK फ्लॅट अथवा रो-हाऊस भाड्याने पाहिजे. मो.नंबर 9922371469.
(04/12-BK-7593)

खरेदी/विक्री

श्री रघुनाथ भिकाजी गायकवाड गट नं. ४५७ ७० गुंठे जमीन विकणे आहे. शिवार मडकीजाम, ता. दिंडोरी, जि. नाशिक. 9422836583.
(03/12-BK-7558)

सावरकरनगर मध्ये 3 BHK बंगला विकणे आहे शारदानगर, विश्वास बँक जवळ रो-बंगलो, १२६ वार प्लॉट मध्ये, 1575 sq.ft. कार्पेट एरिया. संपर्क - 9420829911
(01/12-BK-7472)

3BHK फ्लॅट विकणे. गोविंदनगर जवळ, कर्मयोगीनगर, रणभूमी ग्राऊंड जवळ, इंम्पेरिया बिल्डींग (Imperia Building) संपर्क - 9226433026, 8087240227.
(01/12-BK-7477)

दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करू... पेशंटला सांगा...।। नका सांगू... पेशंटला आणा... ।। नका आणू... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासून १०० टक्के मुक्ती... सर्व सुविधांनी परिपूर्ण : * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर संपर्क : 9552619752. डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (09/01/25)
(CRINV-23-24JL/ CRG00555)

व्यसनमुक्ती

गॅरंटीने सोडवा. दारू + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखू + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी. डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ.पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. मो. 9552619752. www.drpalvenashamuktikendra.in, १००% रिझल्ट. (09/01/25)
(CRINV-23-24JL CRG00554)

वाहन विषयक

सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे, जुनाट संधीवात/ चिकन गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मूळव्याध, एचआयव्ही, भूक लागत नाही? वजन कमी? थकवा जाणवतोय?, Low CD4 Count? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा- अहमदनगरचे सुप्रसिद्ध डॉक्टर पालवे, वरणगाव. मो.नं. 9552619752. (09/01/25)
(CRINV-23-24JL/CRG00556

नावात बदल

My old name is Shaikh Shakeel Ayub Bhadgonkar / Shakeel Ahmad Ayub Shaikh that has been changed now as Ahmed Ayub Shakil as per Aadhar/UID No. 4834 1713 9406 & Mah. Govt. Gazzet Sr.No. D1109 dated 14 August 2003. (BK-7589)

माझे नाव जुने ताई गंगाधर विखे होते आता माझे नवे नाव राजश्री ज्ञानेश्वर गायकवाड हे आहे. आधार क्रमांक : 4770 6016 6474.
(BK-7590)

My old name Haseena Karim Shaikh has been changed to my new name Fehmida Mohammed Farooque Shaikh as per Aadhar No. 2784 2492 5332. (BK-7591)

My OLD name SHAIKH RIYAZ MOHD MUSTAK has been changed to RIYAZ MOHAMMAD SHAIKH As Aadhar No. 6779 8112 8414. (BK-7592)

My OLD name SAYYED ASIM ILYAS has been changed to AASIM ILYAS SAYYED As Aadhar No. 9171 4654 4591.
(BK-7592)

I Aliya Danish Khan In my document My Father name Shaikh Irfan Razvi is Wrongly Mentioned His Correct Name is Irfan Rahemtulla Shaikh As per My Birth Certificate No. 04951. (01/12)

वाचकांना विनम्र सूचना

'देशदूत' वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची देशदूत वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल देशदूत वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.